# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार


NO.: MERC/ADM/RTI/057/2024/**0530** Dt. 26.08.2024

प्रति,
श्री. चंदू विजय पाटील,
मनवेलपाडा रोड, मिठबाव वाडी,
जीवदानी प्लाझा समोर, विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१३०५.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि.१९.०८.२०२४ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज, आयोगाच्या कार्यालयास दि.२०.०८.२०२४ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील मधील माहिती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | अर्जासोबत जोडलेल्या व मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे कार्यालयात दिनांक ०९/०६/२०२४ रोजी ईमेलद्वारे दाखल केलेल्या तक्रार अर्जातील गंभीर मुद्यांचे गांभीर्याने अवलोकन करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ कलम ८.१०.१ नुसार महावितरणचा वसई मंडळ विभाग कार्यक्षेत्राचा परवाना रद्द करण्याकामी मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या कार्यालयाने शासनाच्या प्रचलित नियमानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी. | संबंधीत प्रकरणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यालयात 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२' नुसार, कोणत्याही प्रकारची याचिका मा. आयोगासमोर दाखल झालेली नसल्यामुळे यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. |
| २ | तसेच तक्रार अर्जाच्या संबंधित महावितरणच्या वसई मंडळातील अधिकाऱ्याविरूध्द विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १४९ नुसार कारवाई होण्याकामी केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती देण्यात यावी.<br><br>(मा. मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायाधिश एस. व्ही. गंगापुरवाला व संदिप व्ही. मारणे ह्यांचे खंडपीठाने जनहित याचिका क्र.१०५/२०२२ मध्ये दिनांक २९/०३/२०२३ रोजी दिलेल्या अंतिम आदेशानुसार मला माहिती अधिकारात माहिती संकलीत करून पुन्हा दावा दाखल करण्याची मुभा दिल्याची नोंद घेत प्रकरणी सदर माहिती अधिकार अर्जाची माहिती शक्य तितक्या शिघ्रतेने देण्यात यावी हि विनंती) | |

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री. अभिजीत चाटुफळे, उपसंचालक (प्रशासन व वित्त) / प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५ / ६९ **Email: abhijeet.chatuphale@merc.gov.in**.

आपला विश्वासू,

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव